**WALK IN INTERVIEW**
सूचना : फक्त गरजू अणि कायम स्वरूपी व्यक्तींनीच यावे.
**1. ARCHITECTURAL DRAFTSMAN**
**Qualification:** DCE/BE(Civil),/B.Arch, Practicle Experience Of Autocad,Excel, Etc. English , (Marathi) Typing and Other Necessary Softwares.
**2. CLARCK**
**Qualification:** B.Com with MSCIT, TALLY PLUS ENGLISH (MARATHI) TYPING
TONGASE PATIL BUILDCON SOLUTIONS Pvt.Ltd.
**Contact: Mob: 7304632158**



पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
# हिंदुस्थान
७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक १११ वा ■ ■ अमरावती, सोमवार,दिनांक ८ डिसेंबर २०२५ ■ ■संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १८ मार्गशिर्ष १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







# आजपासून विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन

## सरकारच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार; हिवाळी अधिवेशनापूर्वी विरोधकांचा सरकारवर घणाघाती आरोप

नागपूर दि.७ : १९८० मध्ये भाजपाचे १४ आमदार होते, १९७५ मध्ये १६ आमदार होते तेव्हाही विरोधी पक्षनेते देण्यात आले होते. परंतु आताच्या सरकारला विरोधकांची भीती वाटते का? विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेऊन चहापानाला बोलावत असतील तर त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. नागपूर हिवाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्याआधी सरकारकडून विरोधकांना चहापानाचं आमंत्रण देण्यात आले. त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. नागपूरात विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर निशाणा साधला. विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव यांनी ही पत्रकार परिषद घेतली.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र वारंवार



सरकारकडून तारीख पे तारीख देण्याचं काम करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे. केंद्राकडे अतिवृष्टीसाठी प्रस्ताव पाठवला नाही असं पुढे आले. राज्याला केंद्राकडून अद्याप कुठलीही मदत मिळाली नाही. राज्यात शेतकऱ्यांचा अवमान करण्यासाठी महायुती नेत्यांची चढाओढ सुरू आहे. अजित पवार असतील राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांविरोधी विधाने केली.



राज्यातील तिजोरी खाली झाली आहे. ९ लाखाहून अधिक कर्ज राज्यावर आहे. उत्पन्नाचा मोठा वाटा कर्ज परतफेडीवर जात आहे.

महसूल तूट वाढली आहे. निधी वाटपात मोठ्या प्रमाणात असमानता होत आहे असा आरोप त्यांनी केला.

तसेच राज्य दिवाळखोरीला निघाले आहे. मोठ्या शहरात निधी वळवला जातो. छोट्या शहरांना विकासापासून वंचित ठेवले जाते. विदर्भाकडेही दुर्लक्ष केले जात आहे. सरकार पुरवणी मागण्यात मोठ्या रक्कमा सांगत आहेत. लाडकी बहीण म्हणून पाठ थोपवणाऱ्या बहिणींच्या सुरक्षेकडे सरकारचे लक्ष नाही.

महिलांवरील अत्याचार वाढले आहे. दररोज २४ मुलींवर अत्याचार, छळाचे गुन्हे नोंदवले आहे. लहान मुलींवरील अत्याचारात महाराष्ट्र नंबर एकवर आहे. २०२१ मध्ये १०४२८ गुन्हे नोंदवले गेले. २०२२ मध्ये ८३५५, २०२३ मध्ये ९५७० आणि २०२५ मध्ये आतापर्यंत २ हजाराहून अधिक गुन्हे नोंदवले गेलेत. महिला सुरक्षेत सरकार अपयशी ठरले आहे. संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी अशा हत्या झाल्या आहेत. देशमुख प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही बेपत्ता आहे असा आरोप विरोधकांनी केला.

दरम्यान, मागच्या अधिवेशनापासून आतापर्यंत विदर्भात ७५ लोकांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. २०२० ते २०२४ या कालावधीत २१८ मृत्यूची नोंद आहे. २०२५ मध्ये नाशिक, पुणे येथे बिबट्यांच्या हल्ल्यात हजारो नागरीक जखमी झाले. सरकारकडून कुठल्याही उपाययोजना (उर्वरित पान २ वर)

## गोव्यातील नाईट क्लबमध्ये अग्नितांडव, २५ जणांचा मृत्यू



पणजी दि. ७ : गोव्यातील अर्पोरा येथील एका क्लबमध्ये भीषण आग लागल्याची दुर्घटना शनिवारी रात्री घडली आहे. मध्यरात्री लागलेल्या या आगीत तब्बल २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तसेच अनेक जण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही आगीची घटना सिलिंडरच्या स्फोटामुळे घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. ही घटना घडल्यानंतर अग्निशामक दलाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवलं.

ही घटना घडल्यानंतर पंतप्रधान मोदींनी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याशी संवाद साधत घटनेचा आढावा घेतला आहे. तसेच मृतांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला. या घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाखांची मदत आणि जखमी झालेल्यांना (उर्वरित पान २ वर)

## सप्तश्रुंगी गडावर संरक्षण कठडा तोडून इनोव्हा घाटात कोसळली, ५ जणांचा मृत्यू

नाशिक दि. ७ : नाशिकमधून मोठी बातमी समोर येत आहे. नाशिकच्या प्रसिद्ध अशा सप्तश्रृंगी देवीच्या गडाच्या दिशेला जाणाऱ्या घाटात एका कारचा भीषण अपघात झाला आहे. या कारमध्ये सर्व भाविक होते. सर्व भाविक हे सप्तश्रृंगी देवीच्या गडावरुन दर्शन घेऊन परतत होते. यावेळी घाटात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. ही कार थेट खोल दरीत कोसळली आहे. त्यामुळे ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती वर्तवली जात आहे. या कारमध्ये नेमकं कोण होतं आणि ते सुरक्षित आहेत का? याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. पण या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी दर रविवारी भाविकांची गर्दी होत असते. भाविक मनोभावे देवीच्या दर्शनासाठी इथे येत असतात. याशिवाय शनिवार आणि रविवारी सुट्टी असल्याने सप्तश्रृंगी गडावर भाविकांची गर्दी असते. अशाचप्रकारे पाच भाविक हे इनोव्हा कारने देवीच्या (उर्वरित पान २ वर)

## विरोधी पक्षनेतेपदावर देवेंद्र फडणवीसांचे मोठे वक्तव्य विरोधकांवर निशाणा साधत नियमांवर बोट ठेवले



नागपूर दि. ७ : विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती घेतील, तो आमचा निर्णय नाही असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. अध्यक्ष आणि सभापती जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असंही ते म्हणाले. सोमवारपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार असले तरी विधानसभा आणि विधान परिषदेला विरोधी पक्षनेता नाही. त्यावर विरोधकांनी सरकारवर टीकाही केली आहे. त्या टीकेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस बोलत होते. राज्याच्या (उर्वरित पान २ वर)

## विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेस नव्याने मुख्यमंत्री व विधानपरिषद सभापतींकडे प्रस्ताव देणार

नागपूर दि. ७ : विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या प्रश्नावर काँग्रेसने पुन्हा भूमिका कठोर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिषद सभापती राम शिंदे यांच्याकडे नव्याने औपचारिक प्रस्ताव देण्याचे ठरवले आहे. पावसाळी अधिवेशना दरम्यान सतेज पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तोच प्रस्ताव पुन्हा एकदा नव्याने मांडण्यात येणार असल्याची माहिती काँग्रेसचे मुख्य प्रतोद आमदार अभिजित वंजारी यांनी दिली.



**विरोधी पक्षनेतेपद हा आमचा संविधानिक अधिकार**

विधान परिषदेतील संख्याबळ आपल्या बाजूने असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले असून, विरोधी पक्षनेतेशिवाय कामकाज चालू देणार नसल्याचा ठाम इशाराही सरकारला दिला. विरोधी पक्षनेतेपद हा आमचा संविधानिक अधिकार आहे. यापूर्वी भाजपकडे संख्याबळ नसतानाही काँग्रेसने परंपरा पाळली होती. आज आमच्याकडे ठोस संख्या असूनसुद्धा (पान २ वर)

## विरोधकांची नुसती जळजळ मळमळ! महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रीपद घटनाबाह्य होतं का? एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

नागपूर दि.७ : विरोधी पक्षांना एकच सांगणं आहे की,



तुम्ही लोकांचा अजेंडा मांडा. आमचा अजेंडा खुर्चीसाठी नाही. आम्ही काम करणारे आहोत, ते स्पीडब्रेकरवाले आहेत, असा टोला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला. त्यांनी काही बोध घेतला पाहिजे. नुसती जळजळ मळमळ आहे. मी मुख्यमंत्री होतो तेव्हा घटनाबाह्य म्हणायचे, आता पण तेच सुरु आहे. किमान अभ्यास तरी करा असे म्हणत नाव न घेता (पान २ वर)

## १६५० उड्डाणांचे टार्गेट, १३८ पैकी १३७ डेस्टिनेशन पूर्ववत

नवी दिल्ली दि. ७ : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले इंडिगो एअरलाइन हळूहळू सामान्य होत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणांवरील विमान वाहतूक सामान्य होत आहे, ज्यामुळे काही विमानतळांवरील गर्दी कमी झाली आहे. इंडिगोने जवळजवळ सर्व मार्गांवर विमान वाहतूक सामान्य केल्याचा दावा केला आहे. कंपनीने सांगितले की १३८ पैकी १३७ ठिकाणी उड्डाणे सुरू आहेत, परंतु जनतेचा विश्वास परत मिळविण्यासाठी थोडा वेळ लागेल.

जम्मू, अमृतसर, अहमदाबाद, गुवाहाटी, नागपूर आणि ऐझवाल येथून काही उड्डाणे रद्द करण्यात आली असली तरी, रविवारी




सकाळी दिल्ली विमानतळावर गर्दी कमी होती. मुंबई विमानतळावर आठ आणि चेन्नई विमानतळावर ४० उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

रविवारी रात्रीपर्यंत १६५० हून अधिक उड्डाणांचे कामकाज सामान्य करण्याचे इंडिगोचे उद्दिष्ट आहे. मागील लक्ष्य १५०० उड्डाणांसाठी उड्डाणे (उर्वरित पान २ वर)

## सरकार मुजोर आणि बेमुर्वतखोर, विरोधी पक्षनेता नेमला, तर पापं बाहेर येण्याची भीती; भास्कर जाधवांनी महायुतीचे वाभाडे काढले

नागपूर दि. ७ : महायुती सरकारच्या एककल्ली, मनमानी आणि भ्रष्ट कारभारावरून महाविकास आघाडीने हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला अक्षरशः वाभाडे काढले. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांनी लोकशाहीचा पाया हादरवणाऱ्या निर्णयांपासून ते लाखो कोटींच्या भ्रष्टाचारापर्यंत आणि शेतकरी, कामगारांच्या मूलभूत योजनांना बंद पाडण्यापर्यंत सरकारने सर्वच



सीमारेषा ओलांडल्या असल्याचा आरोप केला. सरकार कायद्याचा धाक नष्ट करत आहे. मुख्यमंत्री/गृहमंत्र्यांकडून लगेच 'क्लीन चिट' दिली जाते, असा हल्लाबोलही त्यांनी केला.

**विरोधी पक्षनेतेपदाची दोनही पदे रिक्त ठेवणे हा घटनेचा अवमान**

चहापानाच्या पारंपरिक निमंत्रणाला सरळ बहिष्कार जाहीर करत, भास्कर जाधव यांनी मुख्यमंत्री आणि सरकारवर लोकशाहीचा अपमान केल्याचा आरोप केला. विरोधी पक्षनेतेपदाची दोनही पदे रिक्त ठेवणे हा घटनेचा अवमान असल्याचे ते म्हणाले. ही केवळ परंपरा (उर्वरित पान २ वर)

### माहोल....

विरोधकांचा चहापानावर बहिष्कार




विरोधकांनी जसा चहापानावर बहिष्कार घातला तसा सभागृहात पण घाला म्हणजे सभागृहात झोपा काढून फटाफट अधिवेशन आटोपते घेता येईल...
















